ePaper
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवर राहुल गांधी यांचा अमेरिकेतून प्रहार
वर्ष - 8 । अंक - 264 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज (TM)

## आतील पानांत

- मुंबईचा चेन्नईवर दणदणीत विजय!
- कोहली- अय्यरमध्ये बाचाबाची
- राज ठाकरेंशी संबंध होते ते आता संपले
- काश्मीरमध्ये ढगफुटी, ३ जणांचा मृत्यू

www.mahaenews.com | सोमवार, दि. 21 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### ‘भाजपा’ च्या बड्या नेत्यांचा ‘फ्रंट फूट’ वर खेळण्यावर भर

# ‘टीम मोदी’च्या डोक्यात ‘मेगा प्लॅन’ शिजतोय!

## ‘मोदी टीम’ मधील सर्वच नेते दिल्लीत हजर : वेगवान आणि गुप्त हालचाली सुरू

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार हे सध्या ‘फ्रंट फूट’ वर खेळणार असल्याचे संकेत मिळत आहेत. ‘टीम नरेंद्र मोदी’ च्या डोक्यात काहीतरी शिजत असल्याचे प्रत्येकाच्या लक्षात येत असून ‘मोदी टीम’ मधील सर्वच ज्येष्ठ नेते दिल्लीत हजर झाले असून वेगवान आणि गुप्त हालचालींना चांगलाच वेग आला आहे.**



### भाजपाच्या मॅरेथॉन बैठका, राष्ट्रपतींची भेट

गेले दोन-तीन दिवस राजधानी दिल्लीमध्ये भारतीय जनता पार्टीचे सर्व ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेत्यांची खलबते सुरू आहेत. एकापाठोपाठ एक गुप्त मॅरेथॉन बैठका, नरेंद्र मोदी यांची राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट आणि सविस्तर चर्चा, त्याचप्रमाणे, बैठकांमध्ये काय काय घडले ? ते संघाच्या कार्यकर्त्यांना सांगण्यासाठी पुन्हा ज्येष्ठ नेत्यांच्या बैठका पाहिल्या की लक्षात येते, की आता मोदी सरकार काहीतरी मोठे घडवणार असून आर-पारच्या मूडमध्ये आहे. मोदी सरकार काय करणार असावे? याचा कानोसा घेतला तर पुढील बाबी लक्षात येत आहेत.

### मोदी सरकारचा अजेंडा काय असू शकेल?

भारतीय जनता पार्टीच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांचा कानोसा घेतला तर एक गोष्ट लक्षात येते, की काहीतरी मोठे निर्णय घेऊन संपूर्ण देशाला अचंबित करण्याचे मोदी सरकारने ठरवले असावे. पण, यावेळी सर्व मित्र पक्षांची मोट सुरळीत ठेवण्यावर भर नसून देशाचे संविधान वाचवण्यावर भर आहे, हा मुद्दा पुढे येतो.

### अनेक समस्यांबाबत चर्चा..

सर्वात मोठा मुद्दा आहे, तो पश्चिम बंगालमधील हिंसाचार ! पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तेथील हिंसाचाराला सीमा सुरक्षा दल जबाबदार असल्याचा आरोप केला असून तो थेट मोदी सरकारवर हल्ला समजला जात आहे. कायद्यानुसार सीमा सुरक्षा दलाला मोठे अधिकार देण्यात आले आहेत. पण, त्याच मुद्द्यांवर ममता बॅनर्जी यांनी आक्षेप घेतला आहे. थोडक्यात, त्यांनी मोदी सरकारवर थेट निशाणा साधला आहे.

### तामिळनाडूतील राजकीय संकट..

ामिळनाडूमध्ये तेथील राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्यात जोरदार बेबनाव झाला असून त्यात हस्तक्षेप करण्याची वेळ सुप्रीम कोर्टावर आली आहे. राष्ट्रपतींनी थेट सुप्रीम कोर्टाला आता आदेश दिले असून ती देशाच्या संविधानाशी प्रतारणा आहे, असे तामिळनाडू सरकारचे म्हणणे आहे.

### केंद्राचे कायदे राज्यांना नकोत?

वक्फ बोर्डासारखे केंद्र सरकारने मंजूर केलेले आणि नंतर राष्ट्रपतींच्या सह्या झालेले कायदे काही राज्य सरकारना नको आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्यास काही राज्य सरकारांनी थेट नकार दिला आहे. असे पुढे सुरूच राहिले, तर देश कसा चालणार? आणि समांतर प्रशासन देशाला परवडेल का? या मुद्द्यांवर बैठकांमध्ये भर असावा, असे सांगण्यात येते.

### संघाचा स्वयंसेवकांनान संदेश..

या बैठकांमधून जे काही ठरत आहे, तो संदेश संघ परिवाराकडून त्यांच्या स्वयंसेवकांना दिला जात आहे. आपली धोरणे स्पष्टपणे जनतेपुढे मांडा आणि ती पार पाडा, मोदी सरकारची ज्यांच्याबरोबर आघाडी आहे, त्या पक्षांशी व्यवहार करताना घाबरू नका. वेळप्रसंगी, आघाडी तुटली तरी आपण काळजी करायची नाही. देशाची अखंडता, देशाचे संविधान आणि आपल्या प्रशासनाची मर्यादा या गोष्टी लक्षात ठेवूनच पुढील अभ्यासू पावले टाका, असे संदेश गेले आहेत.

### राहुल गांधी यांचा इशारा आणि सर्व विरोधी राज्ये ‘अलर्ट मोड’ वर..!

देशामध्ये सुरू असलेले राजकारण कशा पद्धतीने हाताळावे आणि ही लढाई आता सुनियोजनबद्ध वैचारिक लढाई झाली असल्याचे संकेत सर्व बैठकांमध्ये चर्चिले जात आहेत. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे की आमची लढाई किंवा संघर्ष हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि ‘इंडियन स्टेट’ बरोबर आहे. त्यातच प्रशासनामध्ये सर्व मोठ्या जागा मोदी यांच्या कृपेने संघ परिवारातील कार्यकर्ते अडवून बसले आहेत, असा गंभीर आरोपही राहुल गांधी यांनी केला आहे. त्याविरुद्ध लढण्यासाठी आता तामिळनाडू, बंगाल, केरळ या राज्यांमध्ये संघ परिवाराला आणि भाजपाला बॅकफूटवर खेळून चालणार नाही, याचीच चर्चा आणि त्याबाबतची ध्येयधोरणे ठरविण्याची व्यूहरचना या बैठकांमध्ये सुरू असल्याचेही खात्रीलायक वृत्त आहे.

# काँग्रेस सोडण्याची वेळ काँग्रेसनेच आणली!

## थोपटे जिकडे जाण्याचे बघत आहेत तिकडे फार अंधारच : पटोले

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेसचे नेते तथा भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला आहे. संग्राम थोपटे हे लवकरच भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती त्यांनी स्वत:च आज पत्रकार परिषदेत दिली. त्यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, काँग्रेस पक्षानेच काँग्रेस सोडण्याची वेळ आणल्याचं विधान संग्राम थोपटे यांनी आज केलं.**





आता त्यांच्या या विधानावर काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिली आहे.'संग्राम थोपटे जिकडे जाण्याचे बघत आहेत तिकडे फार अंधारच आहे', असं म्हणत नाना पटोले यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.पक्ष सोडत असताना ज्या पक्षाने तुम्हाला नावारुपाला आणलं त्या पक्षावर आरोप करायचे नसतात. एवढं सर्वांनीच लक्षात घेतलं पाहिजे. आता काय करायचं ते त्यांची मर्जी आहे. पण त्यांना अजूनही माझा सल्ला आहे की संग्राम थोपटे जिकडे जाण्याचे बघत आहेत तिकडे फार अंधारच आहे. त्यामुळे आता त्यांना एवढ्या वर्षांची त्यांची राजकीय कारकीर्द अंधाराकडे न्यायची असेल तर तो त्यांचा प्रश्न आहे", असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

आमच्या कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की तुम्ही अनेक वर्ष काँग्रेसचं काम करत आहात. मात्र, प्रामाणिकपणे काम करत असतानाही पक्षाने तुम्हाला कायम डावलण्याचं काम केलं. शेवटी तुम्हाला मतदारसंघात जनतेनी तीन वेळा संधी दिली. मतदारसंघात तुम्ही विकासाची कामे केली. पण मतदारसंघात अजून विकासाच्या कामांना गती द्यायची असेल तर आपल्याला दुसऱ्या पक्षात जावं लागेल. त्यामुळे अशा पद्धतीचा निर्णय आज झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेतला आहे", असं संग्राम थोपटे यांनी म्हटलं.मला काँग्रेसकडून कुठेही थांबवण्याचा प्रयत्न झाला नाही. खरं तर मला काँग्रेस सोडण्याची वेळ काँग्रेसनेच आणली. २००९ साली मी पहिल्यांदा या मतदारसंघातून निवडून आलो. पक्षाने मला उमेदवारी दिली आणि मी निवडून आलो. तेव्हा मी नवीन होतो. त्यानंतर २०१४ ला मी पुन्हा निवडून आलो. त्यानंतर २०१९ साली पुन्हा निवडून आलो. तेव्हा महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आलं. तेव्हा काँग्रेसला १२ मंत्रिपदे मिळाली होती. मला संधी मिळेल अशी भावना होती. पण तेव्हा मला संधी मिळाली नाही", असंही ते म्हणाले.

"त्यानंतर नाना पटोले यांनी विधानसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. तेव्हा मला वाटलं होतं की मला संधी मिळेल. पण तेव्हाही मला संधी मिळाली नाही. त्यानंतर महाविकास आघाडीचं सरकार सत्तेतून गेल्यानंतर विरोधीपक्ष नेतेपदाची संधी मिळेल अशी अपेक्षा होती, पण तेव्हाही संधी मिळाली नाही.

### कोणत्या पक्षात प्रवेश करणार?

त्यामुळे कार्यकर्त्यांची भावना आता अशी झाली आहे की पुण्यासारख्या जिल्ह्यात देखील तुम्ही तीनवेळा निवडून आलात तरी देखील तुम्हाला संधी मिळाली नाही. त्यामुळे पक्ष बदलण्याचा निर्णय घेतला पाहिजे अशी भावना कार्यकर्त्यांशी झाली. त्यामुळे हा निर्णय घेतला", असं संग्राम थोपटे यांनी सांगितलं.देशात किंवा राज्यात भाजपाचं सरकार सत्तेत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांचं मत आहे की आपल्या मतदारसंघात विकास कामांना जर गती द्यायची असेल तर भारतीय जनता पक्षात प्रवेश केला पाहिजे, अशी कार्यकर्त्यांची भूमिका आहे.आता कार्यकर्त्यांचं मत आहे की मी भारतीय जनता पक्षाची राजकीय भूमिका घेतली पाहिजे.

## शरद पवारांना हरविण्यासाठीच भाजपमध्ये गेलो : महादेव जानकर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'दगड उभा केला, तरी तो निवडून आणू, असे काँग्रेसला वाटत होते. ते आम्हाला जवळ करत नव्हते. त्यामुळे काँग्रेस आणि शरद पवार यांना सत्तेतून बाहेर काढण्यासाठीच भारतीय जनता पक्षात गेलो,' असे स्पष्टीकरण राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी येथे रविवारी दिले.**



रासपच्या वतीने महादेव जानकर यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या युवा संघर्ष निर्धार परिषदेत ते बोलत होते. प्रहार संघटनेचे संस्थापक बच्चू कडू, अमर कदम, प्रकाश बालवडकर, काशिनाथ शेवते, कुमार सुशील, अजित पाटील, सुधाकर जाधवर, शार्दुल जाधवर यावेळी उपस्थित होते.'राजकारण आणि चळवळ यात खूप फरक आहे. चळवळ नेहमी शेतकरी आणि उपेक्षितांच्या बाजूने उभी राहते. मात्र, राजकारणात उजव्या बाजूला का उभे राहावे लागले, याचे कारण म्हणजे काँग्रेस आम्हाला महत्त्व देत नव्हती. त्यांना नेहमी वाटायचे, की यांची काय गरज आहे? त्यांच्या समाजातील एखाद्याला मंत्री केले, की त्यांचे काम संपले, असे काँग्रेसला वाटत होते. मात्र, आत्मविश्वास गमाविलेल्या समाजाला पुढे आणण्याचे काम मी, राजू शेट्टी आणि बच्चू कडू यांनी एकत्रित केले. काँग्रेसचे मतदार फिरवून त्यांना सत्तेतून बाहेर काढण्यासाठी भाजपमध्ये गेलो,' असे जानकर यांनी सांगितले.ते म्हणाले, 'भाजपबरोबर कोणतेही भांडण नाही. भाजप आजही युतीत येण्याचे निमंत्रण देत आहे. मी धाकटा भाऊ असल्याचे पंतप्रधान सांगतात. भाजप आजही आमदार, खासदार करायला तयार आहे. मात्र, मी त्यांच्यासोबत गेलो नाही. कोणाच्या मागे जाऊन आमदार, खासदार व्हायचे नाही.''चमच्यांची फौज जमा करण्याचे काम भाजप आणि काँग्रेसने केले. मी चमचा म्हणून कोणत्याही पक्षाचा झेंडा हाती घेतला नाही. सामाजिक आणि जातीय संघटना चालवणे सोपे असते, पण पक्ष चालवणे कठीण आहे. जात म्हटले, की लोक लगेच एकत्र येतात. सर्व जातींना सोबत घेऊन जाणारा पक्षच पुढे जातो. रासपने चार राज्यांमध्ये चांगले यश मिळवले आहे,' असे जानकर यांनी सांगितले. रासपच्या वतीने महादेव जानकर यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या युवा संघर्ष निर्धार परिषदेत ते बोलत होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की,खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि तिचे विद्यमान मालक **श्री.सदाशिव सागाजी राक्षे रा. साळुंब्रे** ता. मावळ जि.पुणे यांची खरेदी मालकी हक्काची व ताबेवहीवाटीची असुन विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलाकडुन सदर मिळकती च्या विक्री मोबदल्यापोटी विसार रक्कम स्वीकारलेली आहे.आमचे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार निश्चित झालेला आहे.सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी बोजारहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना दिला आहे.याउपरही सदरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार व कोर्ट दावाअसल्यास अशा व्यक्तिने सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ (०८) दिवसांच्या आत मूळ कागदपत्रानिशी खालील पत्त्यावर समक्ष भेटून सर्व अस्सल कागदपत्रे दाखवून आमचे अशिल यांची खात्री पटवून द्यावी व लेखी तक्रार नोंदवून तशी आमची पोच घ्यावी, अन्यथा मुदतीत तसे न केल्यास सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध,निजोखमी बोजारहीत आहे असे समजून व तसेच कोणाचा काही हक्क, हितसंबंध,अधिकार असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे.असे समजुन आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही व तसेच परस्पर कोणत्याही वर्तमानपत्रात घेतलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.कळावे,

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :**

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका मावळ मे. सब रजिस्ट्रार साहेब यांचे कार्यक्षेत्रातील तसेच जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती मावळ यांचे हद्दीतील गाव मौजे साळुंब्रे ता. मावळ येथील जमीन मिळकत ग नं. ९२ यांसी एकूण क्षेत्र ०१ हे ०० आर यांसी आकार ०६ रु ४२ पैसे अशी मिळकत यांसी चतुःसीमा पुढीलप्रमाणे :-

पूर्वेस: गट नं. ९३ व ९४ ची मिळकत
दक्षिणेस: ओढा व दारूब्रेची शिव
पश्चिमेस: गट नं. ९१ ची मिळकत
उत्तरेस: गट नं. ९० ची मिळकत

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णन केलेली मिळकत त्यामधील असलेले जल, तरू, काष्ठ, निधी निक्षेपादी सर्व तदंगभूत वस्तुसहीत तसेच रस्त्याचे वहिवाटीचे व इजमेंटचे सर्व हक्कासाहित दरोबस्त,येणेप्रमाणे जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय असे.पुणे,दि.२१/०४/२०२५

**ॲड. धीरज वा गायकवाड.**
मो.नं - 84850 69907
कलागौरव अपार्टमेंट दापोडी पुणे - १२

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुप्पट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची 'सरकारमान्य' लूट!

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क 'सरकारमान्य' लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकीट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

## बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> "बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> "पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त,
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संतांचा सहवास। याहून भाग्य नाही दुसरे खास

बाह्य प्रपंच प्रारब्ध उपाधि । त्यांसी त्रासू नये कधी । हीच जाणावी उघड समाधि ॥ सावली मातीत पडली । तिला धुऊन नाही घेतली । तसेच खरे आहे देहाचे । पण ते संतांनाच साधे ॥

सर्व संकल्प वर्ज्य करून । अवस्था असावी बालकवृत्तिसमान ॥ सतत विवेक अखंड चित्ती । रामनामी मनोवृत्ति । हेचि तुम्हा परमप्राप्ति ॥ मारुनी खोटी कल्पनावृत्ति । रामनाम अखंड चित्ती । समाधान संतोष शांति ॥

देवासी सर्व करी अर्पण । करी स्वानंदयुक्त परमात्मचिंतन । हीच सिद्ध साधूची खूण ॥ वासना जाळून शुद्ध चित्त । अहंभाव सोडून होई निभ्रांत ॥ आता मी रामाचा, राम माझा । हे जाणावे पूर्ण ॥

संतसहवास त्याला पाही । जो देहबुद्धि टाकून राही॥ संतास न पाहावे देहात । आपण देहापरते होऊन पाहावे त्यास ॥ नामात ठेवा प्रेम । हीच संतांची खूण ॥

जे जे आपले संगती आले। संताने त्यांचे सार्थकच केले ॥ साधूने देह ठेवला । तरी सत्तेने जागृत राहिला ॥ त्याची ठेवावी आठवण । सेवा करावी रात्रंदिन॥

संतांचा सहवास । याहून भाग्य नाही दुसरे खास ॥ संतचरणी विश्वास । त्याने भगवंत जोडला खास ॥ लक्ष ठेवावे संताकडे । देह लावावा प्रपंचाकडे॥ नाम घ्यावे श्वासोच्छ्वास । संत संतुष्ट होईल खास ॥

सांगावे संतास नमस्कार । जो जगताचा आधार । संताच्या देहाची प्रारब्धगति संपली । काया आज दिसेनाशी झाली। परि अजरामर राहिली ॥ राम कर्ता हे जाणून चित्तीं । जगात संत ऐसे वर्तती । जेणे दुसऱ्यास मार्गदर्शक होती॥

संतांचे करावे अनुकरण । घ्यावे त्यांचे दर्शन । सांगावे आलो आहे आपण । विचाराव्या कठिण वाटा। जेणे सुलभ होईल व्यवहारी चालता ॥ रामापरता नाही लाभ । हे धरले ज्याने चित्ती । त्यास लाभली खरी संतांची संगति ॥

त्यांचा आदर्श ठेवावा पुढे । कधी न होईल वाकडे ॥ स्वत:चे पावावे समाधान । त्याने लोकांस आणण्याचा प्रयत्न करावा जाण ॥ संताशी व्हावे अनन्य शरण । दुसरीकडे जाण्याचे नाही कारण ॥

# आपण ठाकरे, लाडके भाऊ, महापालिकेला एकत्र येऊ!



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक



**पूर्वी, हिंदी सिनेमांमध्ये एक हमखास 'थीम' असायची.. जत्रेमध्ये दोन भाऊ हरवले.. एक श्रीमंताच्या घरात पोहोचला, तर दुसरा गरीबाच्या! मग एकाचे जीवन ऐश्वर्यात तर दुसऱ्याचे हलाखीत..मग, ट्रॅजेडी कॉमेडी रोमान्स..आणि शेवटी दोघं एकत्र येऊन गोड शेवट ! या 'थीम' वर शेकडो चित्रपट चालले आणि गाजलेही.. अगदी 'वक्त' पासून ते 'यादों की बारात' पर्यंत ! त्या काळात विभक्त होण्यासाठी काहीही कारणं चालायची.. भूकंपासारखी नैसर्गिक संकटंही मदतीला यायची !**

### साद आणि प्रतिसादाचं पाऊल !

आता आधुनिक जगात समोर आली आहे तीच 'थीम'.. राजकारणात विभक्त होऊन पुन्हा एकत्र येण्याची शक्यता असलेल्या लाडक्या भावांची ! एकानं साद घातली आहे, दुसऱ्यानं प्रतिसाद दिला आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे असताना शिवसेनेची संपूर्ण धुरा एकटे राज ठाकरे सांभाळायचे. पण, नंतर उद्धव ठाकरेंनी मैदानात उडी घेतली..वंदनीय बाळासाहेबांनी उद्धव यांच्या नेतृत्वाला ग्रीन सिग्नल दिला, अन बाहेर पडून राज ठाकरेंना नवीन पक्ष काढावा लागला..हा इतिहास अगदी ताजा आहे ! गेले दोन दिवस मराठी मीडियाला चर्चेसाठी दुसरा विषय नाही याचं खरं आश्चर्य वाटतंय..!

### वीस आमदार एकाकडे शून्य..

मूळ शिवसेनेच्या उबाठा गटाला विधानसभा निवडणुकीत फक्त २० जागा मिळाल्या आहेत आणि राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाला एकही जागा नाही, अशा दोन पक्षांचे नेते आपले मतभेद विसरुन एकत्र येणार, अशी नुसती चर्चा झाली, त्याची भलीमोठी बातमी करण्याचे प्रयोजन लक्षात येत नाही. अजून कशात काही नाही, लग्न करायचे की नाही हे ठरलेले नाही आणि पोराचे नाव ठेवण्याची तयारी सुरु झाली आहे. मीडियासाठी दीनानाथ, वक्फ बोर्ड यापेक्षा वेगळी बातमी सापडली म्हणून असेल कदाचित, पण दोन भावांच्या मनोमीलनाला मीडियाने अक्षरशः डोक्यावर घेतलं आहे हे खरं..

### वंदनीय बाळासाहेबांचे स्थान अढळ !

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्थान वादातीत आहे, हे प्रत्येकाला मान्य आहेच. मराठी माणसाच्या हितासाठी त्यांनी केलेला संघर्ष इतिहासाची पानेच्या पाने लिहून गेला आहे. पण, आता एक तप होऊन गेले, बाळासाहेब हयात नाहीत. शिवसेना त्यांचे चिरंजीव उद्धव यांच्या हाती आली. आता, त्या पक्षाचे देखील दोन भाग झाले. त्यातील अधिकृत भाग एकनाथ शिंदे घेऊन गेले, आणि उद्धव यांच्याकडे एक गट राहिला.

### राज ठाकरे यांचा सवता सुभा

वंदनीय बाळासाहेबांनी आपले चिरंजीव उद्धव यांना आशीर्वाद दिल्यामुळे आपल्याला शिवसेनेत फारसे स्थान नाही, हे लक्षात घेऊन राज ठाकरे यांनी वेगळा पक्ष काढला होता. त्या पक्षामुळे २००९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना आणि भाजपा या दोघांचेही नुकसान झाले. राज ठाकरे यांची भाषणे प्रभावी असतात. त्यामुळे पुण्यात बारा वर्षांपूर्वी मनसे महानगरपालिकेत सर्वात मोठा आणि नंतर विरोधी पक्ष झाला होता. नाशिक महानगरपालिकेत मनसेची सत्ता आली होती. पण, काळाच्या ओघात मनसे पुन्हा मागे पडली, तो भाग वेगळा !

### उद्धव यांचे घालीन लोटांगण..

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री होण्यासाठी सगळा पक्ष आणि होती ती पुण्याई पणाला लावली. पण, पाच वर्षांत गोळाबेरीज काय झाली, याचा हिशेब अजून करता आला नाही. त्यांना अडीच वर्षे मुख्यमंत्री होता आले आणि आपल्या मुलाला मंत्री करता आले एवढेच. पण त्यासाठी त्यांना हिंदुत्व, स्वाभिमान, वंदनीय साहेबांचा कणखरपणा सोडावा लागला आणि थेट दोन्ही काँग्रेसपुढं जाऊन लोटांगण घालावं लागलं!

### झाकली मूठ केव्हाच उघडली !

वंदनीय बाळासाहेब यांनी मुख्यमंत्री होण्याचे ठरविले असते तर त्यांना काहीच अशक्य नव्हते. पण, त्यांची आपले स्थान आणखी उंचीवर नेऊन ठेवले. आता, एक लक्षात घ्यायला हवे की वंदनीय बाळासाहेब यांची उंची त्यांचे पुत्र किंवा पुतण्या यांना गाठणे शक्य आहे का? याचे कारण म्हणजे दोघांनी आपली झाकली मूठ उघडली आहे. आदित्य आणि अमित या दोघांना निवडणुकीच्या रिंगणात आणणे, स्वतः उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेत सदस्य राहणे इत्यादी बाबी लक्षात घेतल्या तर पुढे वाढवून ठेवलेल्या राजकीय अडचणी लक्षात येतील.

### उद्धव ठाकरे यांचे भांडवल बघा..

एका बाजूला अत्यंत कमकुवत झालेल्या दोन काँग्रेस पक्षांबरोबर चुंबाचुंबी आणि दुसरीकडे तगड्या भाजपाशी वैर एवढ्या किरकोळ भांडवलावर उद्धव ठाकरे आपला पक्ष कसा वाढवणार, हा मोठा प्रश्न आहे. मराठी अस्मिता ही मुख्यतः काँग्रेस पक्षाच्या विरोधात होती. महाराष्ट्रातील भाजपाला दिल्लीतून लादलेला पक्ष असे मानले जात नाही. अशा परिस्थितीत वंदनीय बाळासाहेब यांच्या काळात जे मुद्दे प्रभावी होते, ते आता ठाकरे बंधू पहिल्यापासून उपस्थित करणार आहेत का, हा महत्वाचा प्रश्न असून त्यांचा प्रभाव कितपत पडेल, हे पाहणे उचित ठरेल!

### मीडियातून फक्त चर्चा आणि चर्चाच..

सध्या तरी मीडियाच्या माध्यमातून नुसती चर्चा सुरू आहे एवढेच. प्रत्यक्षात, हे दोघे भाऊ समोरासमोर आलेले नाहीत किंवा त्यांच्यात प्रत्यक्ष संपर्क झालेला नाही, हे लक्षात घ्यायला हवे! ज्या कार्यकर्त्यांना किंवा नेत्यांना वाटते की या दोघांनी एकत्र यावे, त्यांच्या मुलाखती किंवा डिबेट विविध वृत्तवाहिन्यांवर सुरू आहे, एवढेच !

### दोन्ही नेते म्हणतील, ती पूर्व दिशा..

दुसरीकडे, असे ऐक्य आणि संयुक्त काही उपक्रम करणे सोपे नाही. कारण, दोनही पक्षांचे नेते 'मी म्हणेन ती पूर्व दिशा' मानणारे आहेत, एवढे लक्षात घेतले तरी पुरे. दोघांनाही मानणारा वर्ग महाराष्ट्रात काही प्रमाणात आहे. काही चांगले होत असेल तर लोक आपोआप मागे येतील, याची या दोघांना आणि जनतेला खात्री आहे ! पण, मूळ शिवसेनेतून राज ठाकरे फुटल्यापासून त्यांनी उद्धव यांच्यावर केलेले आरोप कार्यकर्ते विसरलेले नाहीत.. राज ठाकरेही विसरले नसणार !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तर आज शिवसेनेचे दोन तुकडे झाले नसते!

## आमच्याकडून चूक झाली", रामदास कदमांचं मोठं विधान

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्याच्या राजकारणात शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीची चर्चा सुरु आहे. राज ठाकरे यांनी ठाकरे गटाबरोबर युती करण्याबाबत सूचक भाष्य केलं होतं. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी देखील प्रतिसाद देत सकारात्मक भूमिका मांडली. त्यामुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. यावर राजकीय नेते मंडळींच्या प्रतिक्रिया येत आहेत.**





### आता सगळं अवकाश फाटलं

"राज ठाकरे यांनी अनेकवेळा उद्धव ठाकरे यांच्यासमोर टाळी मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, दुर्दैवाने उद्धव ठाकरे यांनी होकार दिला नाही. त्यावेळी उद्धव ठाकरे माझ्याकडे असं म्हणाले होते की, एक म्यान में दो तलवार नही रखते. हे वाक्य उद्धव ठाकरे यांचं होतं. तेव्हा राज ठाकरे यांची मागणी काय होती? तर माझ्याकडे फक्त दोन जिल्ह्याची जबाबदारी द्या. एक पुणे आणि नाशिक, बाकी उद्धव ठाकरे यांनी सर्व सांभाळावं. तरीही उद्धव ठाकरे नाही बोलले", असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे. "आता उद्धव ठाकरे यांच्यावर अशी वेळ आलेली आहे की त्यांच्या हातातून सर्वच गेलेलं आहे. आता सगळं अवकाश फाटलं आहे.

आता शिवसेना शिंदे (पक्षाचे) नेते रामदास कदम यांनी यावर प्रतिक्रिया दिली. यावेळी रामदास कदम यांनी एक मोठं विधान केलं. 'आमच्याकडून एक चूक झाली. महाबळेश्वरला जेव्हा उद्धव ठाकरेंना पक्षाचं अध्यक्ष केलं, तेव्हा राज ठाकरेंना अध्यक्ष करायला हवं होतं', असं रामदास कदम यांनी टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटलं आहे.उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. याबाबत बोलताना रामदास कदम म्हणाले की, "दोन्ही ठाकरे एका व्यासपीठावर, एका ठिकाणी येणार असतील तर नक्कीच मराठी माणसांचं हित आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र आले पाहिजेत हे माझं मत आजही आणि आधीही होतं. खरं तर मी आणि बाळा नांदगावकर आम्ही दोघांनी दोन्ही ठाकरे एकत्र येण्यासाठी खूप प्रयत्न केलेले आहेत", असं रामदास कदम यांनी म्हटलं."राज ठाकरे यांनी अनेकवेळा उद्धव ठाकरे यांच्यासमोर टाळी मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, दुर्दैवाने उद्धव ठाकरे यांनी होकार दिला नाही. त्यावेळी उद्धव ठाकरे माझ्याकडे असं म्हणाले होते की, एक म्यान में दो तलवार नही रखते. हे वाक्य उद्धव ठाकरे यांचं होतं. तेव्हा राज ठाकरे यांची मागणी काय होती? तर माझ्याकडे फक्त दोन जिल्ह्याची जबाबदारी द्या. एक पुणे आणि नाशिक, बाकी उद्धव ठाकरे यांनी सर्व सांभाळावं. तरीही उद्धव ठाकरे नाही बोलले", असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे. "आता उद्धव ठाकरे यांच्यावर अशी वेळ आलेली आहे की त्यांच्या हातातून सर्वच गेलेलं आहे. आता सगळं अवकाश फाटलं आहे. मग अशा परिस्थितीत राज ठाकरे जर येत असतील तर मग त्यांचा आधार घेऊन आपल्याला राजकारणात डोकं वर काढता येईल का? हा प्रयत्न उद्धव ठाकरे यांचा असावा. मी त्या दोघांनाही जवळून पाहिलेलं आहे. राज ठाकरे हे स्पष्ट बोलणारे आहेत. पण उद्धव ठाकरे हे आतल्या गाठीचे आहेत. उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांना कधीच पुढे येऊन देणार नाहीत. अटी-शर्ती घालण्याचा प्रश्न कुठे येतो? तुम्ही दोघे भाऊ आहात ना?", असं रामदास कदम म्हणाले आहेत.खरं तर त्यावेळी आमच्याकडून एक चूक झाली. मी आता अधिक स्पष्ट बोलणार नाही. पण महाबळेश्वरला जेव्हा उद्धव ठाकरे यांना पक्षाचं अध्यक्ष केलं, तेव्हा आम्ही राज ठाकरे यांना अध्यक्ष करायला हवं होतं. ती शिवसेनेकडून झालेली मोठी चूक आहे. जर राज ठाकरे तेव्हा पक्षाचे अध्यक्ष झाले असते तर आज शिवसेनेचे दोन तुकडे झाले नसते. शिवसेना फुटली नसती", असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे.आता शिवसेना शिंदे (पक्षाचे) नेते रामदास कदम यांनी यावर प्रतिक्रिया दिली. यावेळी रामदास कदम यांनी एक मोठं विधान केलं. 'आमच्याकडून एक चूक झाली. महाबळेश्वरला जेव्हा उद्धव ठाकरेंना पक्षाचं अध्यक्ष केलं, तेव्हा राज ठाकरेंना अध्यक्ष करायला हवं होतं', असं रामदास कदम यांनी टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटलं आहे.उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. याबाबत बोलताना रामदास कदम म्हणाले की, "दोन्ही ठाकरे एका व्यासपीठावर, एका ठिकाणी येणार असतील तर नक्कीच मराठी माणसांचं हित आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र आले पाहिजेत हे माझं मत आजही आणि आधीही होतं. खरं तर मी आणि बाळा नांदगावकर आम्ही दोघांनी दोन्ही ठाकरे एकत्र येण्यासाठी खूप प्रयत्न केलेले आहेत", असं रामदास कदम यांनी म्हटलं.

# महाराष्ट्रात हिंदी भाषा लादली जातेय का?

## तीन भाषा शिकणं अनिवार्य आहे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने म्हणजेच एससीईआरटीने नुकताच 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४' तयार केला आहे, जो सुरू होत असलेल्या शैक्षणिक वर्षापासून लागू केला जाणार आहे. यानुसार मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील पहिली ते पाचवी इयत्तेच्या विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजीसह आणखी एक भारतीय भाषा शिकता येणार आहे.**



### इंग्रजीचे मात्र गोडवे गातो...

महाराष्ट्रात मराठीचीच सक्ती असणार आहे. इतर कुठलीही सक्ती नाही."मला आश्चर्य वाटतं की हिंदीसारख्या भारतीय भाषेला आपण विरोध करतो आणि इंग्रजीचे मात्र गोडवे गातो. इंग्रजी खांद्यावर घेऊन मिरवतो. आपल्याला इंग्रजी जवळची आणि भारतीय भाषा दूरची ही का वाटते याचाही विचार केला पाहिजे.

या पार्श्वभूमीवर राज्यात हिंदी भाषा अनिवार्य केल्याच्या चर्चा सुरू असून यावरून राज्य सरकारवर टीका केली जात आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर हिंदी लादली जात असल्याच्या आरोपावर अखेर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे.मुख्यमंत्री फडणवीस या मुद्द्यावर बोलताना म्हणाले की, "मराठीच्या ऐवजी हिंदी अनिवार्य केलेली नाही. मराठी अनिवार्यच आहे. पण नवीन शैक्षणिक धोरणात तीन भाषा शिकण्याची संधी दिली आहे. तीन भाषा शिकणं अनिवार्य आहे. या तीन भाषांपैकी दोन भाषा भारतीयच असल्या पाहिजेत असा नियम आहे. त्यामुळे दोन भारतीय भाषांमध्ये एक मराठी आपण अनिवार्य केली आहे. दुसरी भाषा कोणती? तर ती कुठलीही भारतातील भाषा घेतली तर ती हिंदी, तमिळ, मल्याळम, गुजराती किंवा इतर कुठली तरी घ्यावी लागेल. याच्या बाहेरची तर घेता येणार नाही."ज्यावेळेस समितीने मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीकडे रिपोर्ट दिला, त्यामध्ये तिसरी भाषा जर हिंदी ठेवली तर त्याचे शिक्षक आपल्याकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे त्यातून अधिकच्या शिक्षकांची आवश्यकता पडणार नाही. इतर भाषा ठेवली तर त्याचे शिक्षक उपलब्ध नाहीत, ही त्यांची शिफारस आहे. यामध्ये कुठेही अतिक्रमण नाही," असे फडणवीस पुढे बोलताना म्हणाले. फडणवी हिंदी सोडून इतर भाषा शिकण्याबद्दल बोलताना म्हणाले की, "जर कोणाला हिंदीच्या व्यतिरिक्त इतर भाषा शिकायची असेल तर ती शिकायची पूर्ण मुभा आम्ही देऊ. कारण तशी मुभा नवीन शैक्षणिक धोरणाने दिली आहे. मात्र किमान २० विद्यार्थी असले तर त्याला शिक्षक देता येईल, पण त्यापेक्षा कमी विद्यार्थी असले तर मात्र ऑनलाईन किंवा वेगळ्या पद्धतीने ती भाषा शिकवावी लागेल. आपल्या सीमावर्ती भागात असे शिक्षकही उपलब्ध असतात आणि अशी द्विभाषा पद्धत देखील असते. पण हिंदी लादण्याचा प्रयत्न होतोय म्हणणं चुकीचं आहे.

# काश्मीरमध्ये ढगफुटी, 3 जणांचा मृत्यू

## शेकडो लोकांचं स्थलांतर, रस्ते आणि हवाई वाहतूकही विस्कळीत



### शेकडो लोकांचं स्थलांतर

आतापर्यंत सुमारे ५०० लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे.तसेच रामबन शहराच्या बाहेरील एका गावात घराच्या ढिगाऱ्याखाली तीन जण गाडले गेले आहेत. त्यांचे मृतदेह प्रशासनाने बाहेर काढल्याची माहिती उपायुक्तांनी सांगितली आहे. तसेच प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची टीम अडचणीत असलेल्या लोकांना अद्यापही मदत करण्यासाठी काम करत असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.रामबन जिल्ह्यातील विविध ठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे जम्मू आणि श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग वाहनांसाठी बंद करण्यात आला आहे. श्रीनगरला जाणारी विमान वाहतूकही विस्कळीत झाल्याची माहिती समोर आली आहे.

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाऊस पडत आहे. रविवारी सकाळी रामबन जिल्ह्यातील सेरी बागना भागात मोठ्या प्रमाणात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. तसेच वारा आणि गारपीट झाल्यामुळे तीन जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक ठिकाणी इमारती कोसळल्या आहेत. तसेच ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेकडो रहिवाशांना स्थलांतरित करण्यात आले आहे. मुसळधार पाऊस आणि वाऱ्यामुळे वाहतुकीलाही मोठा अडथळा निर्माण होत असल्याची माहिती सांगितली जात आहे.**

रामबन जिल्ह्यात ढगफुटी आणि अचानक आलेल्या ढगफुटी सदृश्य पावसाच्या परिस्थितीमुळे परिस्थिती बिकट झाली आहे. दोन हॉटेल्स, काही दुकानं आणि काही घरांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तसेच अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आले आहेत. रामबनच्या उपायुक्तांनी द इंडियन एक्स्प्रेसशी संवाद साधनाना सांगितलं की रात्री १.१० वाजता सुरू झालेला मुसळधार पाऊस दुपारपर्यंत सुरूच होता.हवामान खात्याने आधीच सतर्कतेचा इशारा दिला होता. तसेच जिल्हा प्रशासनाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी अनेक भागात या संदर्भातील परिस्थितीबद्दल सतर्कतेच्या सूचना देखील दिल्या होत्या. दरम्यान, उपायुक्त कार्यालयाने स्थापन केलेल्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाने सखल भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्यासाठी महसूल आणि पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले आहे. आतापर्यंत सुमारे ५०० लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे.तसेच रामबन शहराच्या बाहेरील एका गावात घराच्या ढिगाऱ्याखाली तीन जण गाडले गेले आहेत. त्यांचे मृतदेह प्रशासनाने बाहेर काढल्याची माहिती उपायुक्तांनी सांगितली आहे. तसेच प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची टीम अडचणीत असलेल्या लोकांना अद्यापही मदत करण्यासाठी काम करत असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.रामबन जिल्ह्यातील विविध ठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे जम्मू आणि श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग वाहनांसाठी बंद करण्यात आला आहे.

श्रीनगरला जाणारी विमान वाहतूकही विस्कळीत झाल्याची माहिती समोर आली आहे. ढगफुटीमुळे अनेक इमारतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेकडो वाहनेही चिखलात अडकली आहेत. तसेच अद्यापही मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे आता हवामानात बदल झाल्यानंतर पाऊस पडण्याचा बंद झाल्यानंतर मालमत्तेच्या नुकसानीचा आढावा घेतला जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

रामबन जिल्ह्यात ढगफुटी आणि अचानक आलेल्या ढगफुटी सदृश्य पावसाच्या परिस्थितीमुळे परिस्थिती बिकट झाली आहे. दोन हॉटेल्स, काही दुकानं आणि काही घरांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तसेच अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आले आहेत. रामबनच्या उपायुक्तांनी द इंडियन एक्स्प्रेसशी संवाद साधनाना सांगितलं की रात्री १.१० वाजता सुरू झालेला मुसळधार पाऊस दुपारपर्यंत सुरूच होता. हवामान खात्याने आधीच सतर्कतेचा इशारा दिला होता. दरम्यान, उपायुक्त कार्यालयाने स्थापन केलेल्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाने सखल भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्यासाठी महसूल आणि पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले आहे.

# राज ठाकरेंशी संबंध होते ते आता संपले!

## वैयक्तिक वगैरे आत्तापर्यंतचे जे शब्द होते ते पुरे करा : आशिष शेलार





### आशिष शेलार काय म्हणाले?

वैयक्तिक वगैरे आत्तापर्यंतचे जे शब्द होते ते पुरे करा. माझ्या दृष्टीने वैयक्तिक मित्र होते तो विषय आता संपला, राजकीय भाष्य इतकंच करेन त्या दोघांचा प्रश्न आहे. ते दोन पक्ष आहेत त्यांनी ठरवावं. असं आशिष शेलार यांनी म्हटलं आहे. आशिष शेलार आणि राज ठाकरे या दोघांचे मैत्रीपूर्ण संबंध अनेकदा पाहण्यास मिळाले आहेत.

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी झालेल्या एका मुलाखतीत उद्धव ठाकरेंबरोबर युती करण्यास, टाळी देण्यास मिळवण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला. राज ठाकरेंनी महेश मांजरेकर यांना दिलेल्या मुलाखतीत हे वक्तव्य केलं आहे. ज्याला उद्धव ठाकरेंनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. ज्यानंतर आशिष शेलार यांनी राज ठाकरेंशी असलेले वैयक्तिक संबंध संपल्याचं म्हटलं आहे.**

प्रश्न असा आहे की कुठल्याही मोठ्याही गोष्टीसाठी आमच्यातले वाद (ठाकरे बंधू) आमच्यातली भांडणं ही किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. या महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी वाद आणि भांडणं या गोष्टी अत्यंत क्षुल्लक आहेत. त्यामुळे एकत्र येणं आणि एकत्र राहणं यात मला काही कठीण गोष्ट वाटत नाही. विषय फक्त इच्छेचा आणि तो माझ्या एकट्याच्या इच्छेचा नाही. सगळ्या महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांतील मराठी माणसांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा हे माझं म्हणणं आहे. मी शिवसेनेत होतो तेव्हा बाळासाहेब ठाकरेंशिवाय मी कुणाच्या हाताखाली काम करत नव्हतो. उद्धव बरोबर काम तेव्हाही करत होतोच. आता समोरच्यांची इच्छा आहे का की मी बरोबर काम करावं? असा सवाल राज ठाकरेंनी महेश मांजरेकरांना दिलेल्या मुलाखतीत विचारला. त्यानंतर उद्धव ठाकरेंनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. अगदी किरकोळ भांडणं बाजूला ठेवायला मी देखील तयार आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी, मराठीसाठी एकत्र येण्याचं आवाहन करतो. आम्ही जेव्हा लोकसभेच्या वेळी सांगत होतो की गुजरातमध्ये महाराष्ट्रातले उद्योग घेऊन जात आहेत, तेव्हाच विरोध केला असता तर आज ते सरकार तिकडे बसलं नसतं. आज महाराष्ट्राच्या हिताचं विचार करणारं सरकार केंद्रात बसवलं असतं आणि महाराष्ट्रातही त्याच विचाराचं सरकार बसलं असतं. पण तेव्हा पाठिंबा द्यायचा, आता विरोध करायचा. मग परत तडजोड करायची असं नाही. महाराष्ट्राचं हित मग त्याच्या आड जो कुणी येईल त्याला मी घरी बोलवणार नाही, त्याच्या घरी जाणार नाही त्याचं स्वागत करणार नाही हे आधी ठरवा. मग महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यातली भांडणं नव्हतीच पण जी काही होती ती मिटवून टाकली चला. त्यावेळी सगळ्या महाराष्ट्राने ठरवायचं की भाजपाबरोबर जायचं की माझ्याबरोबर. मग काय ते ठरवा.

# उज्ज्वल निकम यांच्या बायोपिकमधून आमिर खानचा पत्ता कट

१९९३ चा बॉम्बस्फोट, गुलशन कुमार खून प्रकरण, प्रमोद महाजन हत्या प्रकरण, २००८ मधील २६/११ मुंबई हल्ला, तसंच २०१६ च्या कोपर्डी बलात्कार आणि खून खटल्यासारख्या अनेक महत्त्वाच्या आणि मोठ्या प्रकरणात सरकारी वकिलाची भूमिका बजावणारे प्रसिद्ध वकील म्हणजे उज्ज्वल निकम. याच उज्ज्वल निकम यांच्या जीवनावर आधारित लवकरच बायोपिक येणार आहे. या बायोपिकचं दिग्दर्शन दिनेश विजान करणार आहेत.गेल्या वर्षापासून उज्ज्वल निकम यांच्यावरील बायोपिकची चर्चा सुरू आहे. या चित्रपटात वकिलाची भूमिका साकारण्यासाठी आमिर खानला विचारण्यात आल्याचे बोलले जात होते. 'सितारे जमीन पर' या चित्रपटापूर्वी आमिरने उज्ज्वल निकम यांच्या बायोपिकसाठीही होकार दिला होता. परंतू, आता त्याने हा चित्रपट करण्यास नकार दिल्याचे समोर येत आहे. पिंकव्हिलाच्या वृत्तानुसार, अभिनेत्याने हा चित्रपट करण्यास होकार



दिला होता; पण आता तो या चित्रपटातून बाहेर पडणार आहे.मिड-डेच्या वृत्तानुसार, आमिर खान आता उज्ज्वल निकम यांच्या बायोपिकचा भाग नाही. पण तो निर्माता म्हणून या चित्रपटाचा भाग असेल असे म्हटले जात आहे. त्यामुळे आमिरनंतर आता दिग्दर्शक दिनेशने त्याच्या आवडता अभिनेता राजकुमार रावला या चित्रपटात घेण्याचा विचार केला आहे असं म्हटलं जात आहे. उज्ज्वल निकम यांच्या भूमिकेसाठी राजकुमार राव अगदी योग्य आहे, त्यामुळे त्याने ही भूमिका करावी असं दिनेशला वाटतं. उज्ज्वल निकम यांच्या भूमिकेसाठी दिनेशने राजकुमार रावशी बोलल्याचेदेखील म्हटलं जात आहे. पण आता राजकुमार राव सध्या दिग्दर्शक विक्रमादित्य मोटवानी यांच्या आगामी चित्रपटाच्या चित्रीकरणामध्ये व्यस्त आहे. या चित्रपटात अभिनेता एका खेळाडूच्या भूमिकेत पाहायला मिळणार असल्याने तो यासाठी खूप मेहनत घेत आहे. त्यामुळे आता उज्ज्वल निकम यांच्या बायोपिकमध्ये नक्की कोणता अभिनेता दिसणार? याची अनेकजण वाट पाहत आहे.

## तर माझं मेलेलं तोंड बघाल

बॉलीवूडमधील सर्वोत्तम चित्रपटांपैकी एक म्हणून जंजीर या सिनेमाला गणले जाते. अमिताभ बच्चन यांनी प्रमुख भूमिका साकारलेला हा सिनेमा चांगलाच गाजला होता. अमिताभ बच्चन यांची चित्रपटातील अँग्री यंग मॅन भूमिका प्रेक्षकांना आवडली होती. जंजीर चित्रपटाची पटकथा सलीम खान व जावेद अख्तर यांनी लिहिली होती, तर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन प्रकाश मेहरा यांनी केली होती. मात्र, अमिताभ बच्चन हे या चित्रपटासाठी पहिली निवड नव्हते. धर्मेंद्र यांना या चित्रपटासाठी विचारले होते. मात्र, त्यांनी या चित्रपटाला नकार दिला. त्यानंतर अमिताभ बच्चन यांनी जंजीर या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली, असे वक्तव्य जावेद अख्तर यांनी केले होते. आता बॉबी देओलने त्याच्या वडिलांनी म्हणजेच दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांनी या ब्लॉकबस्टर चित्रपटाला का नकार दिला याचे भावनिक कारण सांगितले आहे. बॉबी देओलने नुकताच इन्स्टंट बॉलीवूडशी संवाद साधला. यावेळी त्याला विचारण्यात आले की, त्याने किंवा त्याच्या कुटुंबातील इतर कोणी कोणाला मदत करण्यासाठी एखादा चित्रपट केला आहे का? यावर बोलताना बॉबी देओल म्हणाला, "माझ्या मावशीचे पती हे आर्थिक अडचणीत होते, त्यांच्यासाठी त्यांनी सत्यकाम हा चित्रपट केला होता.

## अथियाने शेअर केला मुलीचा फोटो



अभिनेत्री अथिया शेट्टी व केएल राहुल नुकतेच आई-बाबा झाले. अथियाने एका गोंडस मुलीला जन्म दिला. अथिया व केएल राहुलची लाडकी लेक तीन आठवड्यांची झाली आहे. त्यांनी आता त्यांच्या मुलीचं नाव जाहीर केलं आहे. इतकंच नाही तर या जोडप्याने लेकीबरोबरचा एक सुंदर फोटोही पोस्ट केला आहे. अथिया शेट्टीने २४ मार्च रोजी मुलीला जन्म दिला. अथिया व केएल राहुल यांचं हे पहिलंच बाळ आहे. बाबा झाल्यावर केएल राहुल आयपीएलचा सामना सोडून मुंबईत आला होता. अथियाने आता इन्स्टाग्रामवर एक फॅमिली फोटो पोस्ट केला आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये त्यांनी मुलीचं नाव सांगितलं आहे.फोटोमध्ये केएल राहुलने लाडक्या लेकीला जवळ घेतलंय आणि अथिया तिच्याकडे प्रेमाने बघतेय. "आमची लाडकी लेक, आमचं सर्वस्व.अथिया शेट्टीच्या या पोस्टवर चाहत्यांनी तसेच कलाकारांनी लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव केला आहे. अनुष्का शर्मा, मलायका अरोरा, समांथा रूथ प्रभू यांनी या पोस्टवर रेड हार्ट इमोजी कमेंट केले आहेत. अनेकांना अथिया व केएल राहुल यांनी त्यांच्या मुलीसाठी जे नाव निवडलं ते आवडलं असून कौतुक केलं आहे.अथिया शेट्टी व केएल राहुल यांनी काही वर्षे एकमेकांना डेट केल्यावर दोन वर्षांपूर्वी २३ जानेवारी २०२३ रोजी लग्नगाठ बांधली. या दोघांचे लग्न सुनील शेट्टीच्या खंडाळा येथील फार्म हाऊसवर पार पडलं होतं. या लग्नाला फक्त दोघांचे कुटुंबीय आणि क्रिकेटविश्वातील व सिनेइंडस्ट्रीतील काही मोजकेच लोक उपस्थित राहिले होते. लग्नाला दोन वर्षे पूर्ण होताच या जोडप्याने आनंदाची बातमी शेअर केली.

## जाट तील कलाकारांवर गुन्हा दाखल!

अभिनेता सनी देओलचा 'जाट' चित्रपट वादात अडकला आहे. पंजाबच्या जालंधरमध्ये पोलिसांनी गुरुवारी रात्री सनी देओल, रणदीप हुडा, अभिनेता विनीत कुमार सिंह, दिग्दर्शक गोपीचंद आणि निर्माते नवीन मालिनेनी यांच्याविरोधात तक्रार दिली आहे. 'जाट' चित्रपटाविरोधात ख्रिश्चन समुदायातील काही लोकांनी आंदोलन केल्यानंतर एफआयआर नोंदवण्यात आला आहे. सदर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९ (जाणीवपूर्वक एखाद्या धर्माचा किंवा धार्मिक श्रद्धांचा अपमान करणे, धार्मिक भावना दुखावणे) अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली आहे.सुरुवातीला, पोलिसांनी तक्रारीचे पुनरावलोकन करण्यासाठी दोन दिवस मागितले होते. त्यानंतर त्यांनी एफआयआर नोंदवून घेतला. स्टेशन हाऊस ऑफिसर (SHO) संजीव कुमार यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी तक्रारीत नाव असलेल्यांविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे आणि पुढील तपास करत आहेत. तपासानुसार कारवाई केली जाईल.१० एप्रिल रोजी सनी देओलचा 'जाट' चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. यात सनी देओल मुख्य भूमिकेत तर रणदीप हुड्डा नकारात्मक भूमिकेत आहे. या चित्रपटात तो राणा तुंगाच्या भूमिकेत आहे जो स्वतःची रावणाशी तुलना करतो. चित्रपटातील एका दृश्यात राणा तुंगा चर्चमध्ये जातो आणि येशू ख्रिस्ताच्या जागी उभा राहतो, तो तेथील क्रॉसचाही गैरवापर करतो, ज्यामुळे ख्रिश्चन समुदायाने नाराजी व्यक्त करत आंदोलन केलं आहे.

## न सांगता दिग्दर्शकाने शूट केला बलात्काराचा सीन

चित्रपटांच्या शूटिंगदरम्यान अभिनेत्रींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. एखाद्या चित्रपटात इंटिमेट सीन दाखवायचे असतील किंवा बलात्काराचा सीन असेल तर त्याचं शूटिंग करणं अभिनेत्रींसाठी खूप अवघड असतं. आता सेटवर इंटिमेसी को-ऑर्डिनेटर असतात, पण काही वर्षांपूर्वीपर्यंत ही संकल्पना नव्हती. एका बॉलीवूड अभिनेत्रीला न सांगता बलात्काराचा सीन शूट करण्यात आला होता. तुम्हाला विश्वास बसणार नाही, पण हे खरं आहे. ९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री आयशा जुल्काने अक्षय कुमारसह अनेक आघाडीच्या अभिनेत्यांबरोबर काम केलं आहे. ३२ वर्षांपूर्वी १९९३ मध्ये तिच्याबरोबर एक प्रसंग घडला होता. 'दलाल' नावाच्या चित्रपटात आयशाची मुख्य भूमिका होती. हा चित्रपट सुपरहिट ठरला होता, पण यामुळे आयशा मात्र वादात सापडली होती.'दलाल'मध्ये एक सीन होता, ज्याबद्दल दिग्दर्शक व निर्मात्यांनी आयशाला काहीच सांगितलं नाही. बलात्काराचा सीन तिच्या बॉडी डबलबरोबर शूट केला. या चित्रपटाचा ट्रायल झाल्यावर एका रिपोर्टरने आयशाला फोन करून या सीनबद्दल विचारलं. तू इतका बोल्ड सीन कसा केलास? हा प्रश्न ऐकताच आयशाला धक्का बसला होता.दलाल'चे दिग्दर्शक पार्थो घोष यांनी आयशाला न सांगता तिच्या बॉडी डबलबरोबर बलात्काराचा सीन शूट केला. या सीनमध्ये तिच्या अंगावर खूप तोकडे कपडे होते.नाराज आयशाने इंडियन मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स असोसिएशनमध्ये तक्रार दिली, कारण ही फसवणूक असल्याचं तिचं म्हणणं होतं.



# मुंबईचा चेन्नईवर दणदणीत विजय!

## सूर्याच्या साथीने रोहित शर्माने घेतला बदला

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादवच्या शतकी भागीदारीच्या जोरावर मुंबई इंडियन्सने सलग तिसरा विजय मिळवला आहे. रोहित शर्माच्या वादळी खेळीची सर्वच जण आतुरतेने वाट पाहत होते आणि अखेरीस चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध सामन्यात रोहितची बॅट तळपली. सलामीला आलेला रोहित शर्मा मुंबई इंडियन्सला विजय मिळवून देतच माघारी परतला. रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादवने १०० पेक्षा अधिक धावांची भागीदारी रचत चेन्नईवर तब्बल ९ विकेट्सने मोठ्या विजयाची नोंद केली आहे.**



चेन्नईने प्रथम फलंदाजी करत ५ विकेट्स गमावत १७६ धावा केल्या. मुंबई इंडियन्सने पहिल्या डावात उत्कृष्ट फिल्डिंग करत चेन्नईला कमी धावसंख्येवर अडवले. तर प्रत्युत्तरात रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादवने ५४ चेंडूत ११४ धावांची खेळी करत मुंबई इंडियन्सला एकतर्फी विजय मिळवून दिला आहे.रोहित शर्माने या सामन्यात दमदार खेळी केली आणि त्याच्या संघासाठी धावांचा पाठलाग करणं सोपं केलं. रोहितने या हंगामातील पहिले अर्धशतक झळकावले. रोहित शर्माचं फॉर्मात परतणं हे संघासाठी खूप महत्त्वाचं असणार अआहे. रोहित शर्मा व्यतिरिक्त सूर्यकुमार यादवनेही अर्धशतक झळकावले. रोहितने नाबाद ७६ आणि सूर्याने नाबाद ६८ धावा केल्या आणि मुंबईने हा सामना ९ विकेट्सने जिंकला.मुंबई इंडियन्सची टॉप फलंदाजी फळी तुफान फॉर्मात आली असून मुंबईने यंदाच्या मोसमातील विजयाची हॅटट्रिक लगावली आहे. चेन्नईने दिलेल्या १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरूवात कमाल झाली.
रायन रिकल्टनने पहिल्याच षटकात २ चौकार लगावत सुरूवात केली. रायन रिकल्टन १९ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह २४ धावा करत बाद झाला.यानंतर रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादवने मुंबईच्या विजयाची जबाबदारी घेतली. रोहित शर्मा ४५ चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकारांसह ७६ धावा करत नाबाद माघारी परतला. तर सूर्यकुमार यादवने ३० चेंडूत ६ चौकार आणि ५ षटकारांसह ६८ धावांची नाबाद खेळी केली आणि १५.४ षटकांत संघाला शानदार विजय मिळवून दिला. यासह मुंबई इंडियन्सचा संघ ८ गुणांसह सहाव्या स्थानी पोहोचला आहे.चेन्नई सुपर किंग्सच्या फलंदाजीला फारशी चांगली सुरूवात झाली नाही. चेन्नईने ११ षटकांत ३ गडी गमावून फक्त ७३ धावा करता आल्या.

### सूर्यकुमारनेही अर्धशतक झळकावले

रोहित शर्माने या सामन्यात दमदार खेळी केली आणि त्याच्या संघासाठी धावांचा पाठलाग करणं सोपं केलं. रोहितने या हंगामातील पहिले अर्धशतक झळकावले. रोहित शर्माचं फॉर्मात परतणं हे संघासाठी खूप महत्त्वाचं असणार अआहे. रोहित शर्मा व्यतिरिक्त सूर्यकुमार यादवनेही अर्धशतक झळकावले. रोहितने नाबाद ७६ आणि सूर्याने नाबाद ६८ धावा केल्या आणि मुंबईने हा सामना ९ विकेट्सने जिंकला.मुंबई इंडियन्सची टॉप फलंदाजी फळी तुफान फॉर्मात आली असून मुंबईने यंदाच्या मोसमातील विजयाची हॅटट्रिक लगावली आहे. चेन्नईने दिलेल्या १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरूवात कमाल झाली. रायन रिकल्टनने पहिल्याच षटकात २ चौकार लगावत सुरूवात केली. रायन रिकल्टन १९ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह २४ धावा करत बाद झाला.

यानंतर, रवींद्र जडेजा आणि शिवम दुबे यांनी अर्धशतकं झळकावली आणि त्यांच्या संघाला या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. शिवम दुबेने ३२ चेंडूत ५० धावा केल्या. तर, रवींद्र जडेजा ३५ चेंडूत ५३ धावा करून नाबाद राहिला.याशिवाय, १७ वर्षीय आयुष म्हात्रेने १५ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. सलामीवीर शेख रशीदनेही १९ धावांचे योगदान दिले. दुसरीकडे, मुंबईकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक २ विकेट घेतले. दीपक चहर, अश्विनी कुमार आणि मिचेल सँटनर यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतली.चेन्नईने प्रथम फलंदाजी करत ५ विकेट्स गमावत १७६ धावा केल्या. मुंबई इंडियन्सने पहिल्या डावात उत्कृष्ट फिल्डिंग करत चेन्नईला कमी धावसंख्येवर अडवले. तर प्रत्युत्तरात रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादवने ५४ चेंडूत ११४ धावांची खेळी करत मुंबई इंडियन्सला एकतर्फी विजय मिळवून दिला आहे.

# विराट कोहली-श्रेयस अय्यरमध्ये बाचाबाची!

## आरसीबीने 48 तासांच्या आत पंजाबच्या पराभवाचा बदला घेतला

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**आरसीबीने पंजाब किंग्सच्या त्यांच्या घरच्या मैदानावर पराभव करत पराभवाचा बदला घेतला आहे. विराट कोहलीच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर आरसीबीने ४८ तासांच्या आत पंजाब किंग्जचा पराभव करून मागील पराभवाचा बदला घेतला.**



१८ एप्रिलला आरसीबीच्या घरच्या मैदानावर पंजाबने संघाचा पराभव केला होता. कोहलीने पंजाबविरुद्ध ७३ धावांची नाबाद खेळी केली आणि त्याचा संघ आरसीबी जिंकताच कोहलीने सेलिब्रेशन करत श्रेयस अय्यर चिडवलं. दरम्यान अय्यर आणि कोहलीमध्ये बाचाबाची झालेली पाहायला मिळाली.प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्सने १५७ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, विराट कोहली सलामीवीर म्हणून आला आणि त्याने जबाबदारी घेतली आणि संघाला सामना जिंकून देत माघारी परतला. कोहलीने ५४ चेंडूत ७ चौकार आणि एका षटकारासह ७३ धावांची नाबाद खेळी केली. ज्यामुळे आरसीबीने सात विकेट्सने सहज विजय मिळवला.
विराट कोहली आणि देवदत्त पड्डिकल यांनी शतकी भागीदारी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. देवदत्त पड्डिकल ३५ चेंडूत ५ चौकार आणि ४ षटकारांसह ६१ धावा करत बाद झाला. यानंतर रजत पाटीदार १२ धावा करत लवकर बाद झाला. नंतर १९व्या षटकात जितेश शर्माने विजयी षटकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. विजयी

### कोहलीने 73 धावांची नाबाद खेळी केली

१८ एप्रिलला आरसीबीच्या घरच्या मैदानावर पंजाबने संघाचा पराभव केला होता. कोहलीने पंजाबविरुद्ध ७३ धावांची नाबाद खेळी केली आणि त्याचा संघ आरसीबी जिंकताच कोहलीने सेलिब्रेशन करत श्रेयस अय्यर चिडवलं.प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्सने १५७ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, विराट कोहली सलामीवीर म्हणून आला.

षटकार पाहताच विराट कोहली श्रेयस अय्यरकडे पाहत त्याला चिडवताना दिसला.विराट कोहली श्रेयसला चिडवत असताना श्रेयस षटकार पाहत होता, पण श्रेयसने विराटला पाहताच त्याच्याजवळ चालत गेला आणि दोघं काहीतरी बोलत हसताना दिसले.
विराट त्याच्याशी बोलत असताना हसत तर होता, पण श्रेयस कुठेतरी पराभवानंतर शांत दिसला. यानंतरही विराट पुन्हा श्रेयसला चिडवण्यासाठी गेला तेव्हाही श्रेयसच्या चेहऱ्यावर फारसे मजेशीर भाव नव्हते.आरसीबीच्या संघाने यंदाच्या मोसमात इतर संघाच्या घरच्या मैदानावरील एकही सामना गमावलेला नाही. तर आरसीबीने आपल्या घरच्या मैदानावरील तिन्ही सामने गमावले आहेत. पंजाब किंग्स संघावरील या विजयासह आरसीबीचा संघ आता १० गुणांसह तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। सोमवार ।
। दि. 21 एप्रिल 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### “सृजन – द क्रिएटिव विंग्स 2024-25” उत्साहात संपन्न

# विद्यार्थ्यांनी गिरवले आंतरराष्ट्रीय ‘फॅशन शो’चे धडे!

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या बाबुरावजी घोलप महाविद्यालयात आयोजन

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील फॅशन टेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्त्र आणि डिझाइन्सचा फॅशन शो “सृजन – द क्रिएटिव विंग्स २०२४-२५” आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला.सामान्य घरातून आलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील फॅशन शो चा अनुभव देणे आणि त्यांना फॅशन, वस्त्र, डिझाईन क्षेत्रातील दिग्गजांशी संवाद साधता यावा यासाठी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी हा फॅशन शो आयोजित केला होता. यंदाचा फॅशन शो हा खादी आणि ज्युट या भोवती गुंफन्यात आलेला होता.**




एलप्रो सिटी स्क्वेअर मॉल ऑडिटोरियम,चिंचवड, पुणे येथे संपन्न झालेल्या या फॅशन शो प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा.कुलगुरू पराग काळकर, विद्यापीठाच्या कुलसचिव ज्योती भाकरे, सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक प्रभाकर देसाई,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य,पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव ॲड. संदिप कदम,प्राचार्य डॉ.संगीता व्ही. जगताप, विभागप्रमुख प्रा.प्रिती सदाशिव जोशी, ज्युरी दीपाली जोशी, पूजा वाघ, प्राजक्ता साळवे ,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य बागेश्री मंथळकर,डॉ नितीन घोरपडे, डॉ देविदास वायदंडे,डॉ.डी.बी. पवार, संदीप पालवे, प्राचार्य पंडित शेळके, डॉ तुषार शितोळे, डॉ. शर्मिला चौधरी, डॉ अंजली काळकर, सरोज पांडे,योगेश पवार आदि यावेळी उपस्थित होते. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य , प्राचार्य डॉ संगीता जगताप म्हणाल्या, अलीकडे एक दोन महीने कपडे वापरुन नवीन ट्रेंडचे कपडे वापरण्याकडे कल असतो. मात्र आमच्या विद्यार्थ्यांनी ज्युट आणि खादी यातून आधुनिक कपडे निर्माण केले आहेत. मुलांचा उत्साह वाढवण्यासाठी आज विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित आहेत, यातूनच मुलांना भविष्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

विभागप्रमुख प्रा. प्रीती सदाशिव जोशी म्हणाल्या, आमच्याकडे विविध कोर्सेस चालतात, हा फॅशन शो पदवीच्या विद्यार्थ्यांचा आहे. एका थीम वर रिसर्च करून या शो मध्ये सादरीकरण केले जाते. आजच्या शो मध्ये ज्युट ला पारंपारिकता जपत मॉडर्न लुक दिल्याचे बघायला मिळते. या फॅशन शोच्या यशस्वीतेसाठी फॅशन टेक्नॉलॉजी विभागाच्या वद्यार्थ्यांच्या मदतीसाठी आणि मार्गदर्शनासाठी फॅशन टेक्नॉलॉजीच्या विभाग प्रमुख प्रा प्रीती सदाशिव जोशी, वीणा करांडे, फातेमा सय्यद, अंजली बोंद्रे, ऋतुजा पाटसकर यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचे पालकही मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर जे बंड्या यांनी केले.

> “ मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी या “सृजन – द क्रिएटिव विंग्स २०२४-२५” चे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना फक्त व्यासपीठ मिळवून न देता त्यांना प्रत्यक्ष इंडस्ट्री शी जोडण्याचे काम आम्ही या शो च्या माध्यमातून करत आहोत.
>
> –ॲड .संदीप कदम, मानद सचिव
> पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

### असा आहे स्पर्धेचा निकाल

फॅशन शो स्पर्धे मध्ये सर्वोत्तम संग्रह श्रेणी 2 क्रम - कार्निवल्स ऑफ कलर्स यामध्ये अनुक्रमे प्रथम तीन तीन क्रमांक मोहिनी खेमनार,समिक्षा नवले, रोनीत तिकोणे. अर्थ एलिगन्स म्हणून आकांशा आखाडकर, कावेरी हिवरेकर, दीपाली गायकवाड, दिव्या पवार यांनी प्रथम तीन क्रमांक पटकावले. सर्वोत्कृष्ट डिझाइन पुरस्कार निवेदिता चव्हाण, स्मिता पडुल, अवंतिका मगरे यांनी तर लँड्स ऑफ डेनिम या कॅटेगरीमध्ये मनीषा कोरे, कल्याणी गोसावी, सायली सरादे यांचा प्रथम तीन क्रमांकात समावेश होता.

# ‘एआय’चा उपयोग स्टार्टअपसाठी करा : महावीर मुथा

## शिक्षण विश्व: पीसीसीओईआरमध्ये ‘देव कार्निवल’चे उत्साहात उद्घाटन

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यापुढील काळात मोठ्या प्रमाणावर होणार आहे. ‘एआय ‘ मुळे रोजगाराच्या संधी जातील अशी भीती व्यक्त केली जाते; परंतु हे खरे नाही. यामुळे रोजगारांच्या संधी, संकल्पना यामध्ये बदल होणार आहे. नव अभियंत्यांनी नोकरीच्या मागे धावण्याऐवजी ‘एआय’चा उपयोग स्टार्टअप साठी करावा असे गुगल डेव्हलपर ग्रुपच्या पुणे विभागाचे प्रमुख महावीर मुथा यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे नेक्स्ट



जनरेशन डेव्हलपमेंट क्लब च्या सहकार्याने ‘देव कार्निवल’चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी कुशल विजय, साह्निक घोष, रॉबिन बंटा, तरुण अभिचंदानी, अमोल निटवे, देवेंद्र यादव, पीसीसीओईआर प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, सेंट्रल प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अर्चना चौगुले, प्रा. डॉ. महेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते. ‘देव कार्निवल’मुळे तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांना ऐकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे. भविष्यात विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आयटी, ऑटोमेशन, औद्योगिक क्षेत्रात कसे बदल होत आहेत आणि होणार आहेत याची माहिती मिळेल. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला पाहिजे, यामुळे तुमच्या ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदावत जातील असे डॉ. शीतलकुमाररवंदळेयांनीसांगितले.

## भाजपाचे आमदार महेश लांडगे यांची मागणी

# मांजरेवाडीकरांच्या ‘अपेक्षे’ला न्याय! द्या!

### अत्याचारी प्रवृत्तीला वचक बसली पाहिजे; ‘फास्टट्रॅक कोर्टात’ खटला चालवा!

**| पिंपरी- चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**खेड तालुक्यातील मौजे मांजरेवाडी (धर्म) येथील महाविद्यालयीन युवतीवर अत्याचार करून तिची अमानुषपणे हत्या झाल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमधील आरोपी अटक आहे. मात्र, पालक तसेच परिसरातील नागरिक प्रचंड भयभीत आहेत. या घटनेतील आरोपीचा खटला तात्काळ ‘फास्टट्रॅक कोर्टात’ चालविण्यात यावा. सदर गुन्ह्यातील आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. महिला भगिनींवर वाकडी नजर ठेवत त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्यांमध्ये जरब बसावी यासाठी, अशी शिक्षा गरजेची आहे असेदेखील आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, पीडित कुटुंबीयांची आमदार लांडगे यांनी सांत्वनपर भेट घेतली. मांजरे कुटुंबीयांवरती दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ग्रामस्थांच्या भावना जाणून घेतल्या. अत्याचारात मृत्युमुखी पडलेल्या मुलीबाबत शोक व्यक्त केला.

मौजे मांजरेवाडी (धर्म) येथील शेतकरी कुटुंबातील 17 वर्षीय विद्यार्थिनी राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर त्यांच्याच गावातील नराधम आरोपी नवनाथ कैलास मांजरे याने अमानुष अत्याचार करून तिचा निर्घृण खून केला. पुरावा नष्ट करत तिचा मृतदेह नदीपर्यंत ओढीत नेऊन भीमा नदीत टाकला होता.

याबाबत आमदार महेश लांडगे म्हणाले की, शेतकरी कुटुंबातील ही विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेत होती. याशिवाय ती उत्कृष्ट कबड्डीपटू उद्यान्मुख खेळाडू होती. अनेक कष्ट करत संबंधित विद्यार्थिनीचे पालक तिला उच्चशिक्षित करण्याचे स्वप्न पाहत होते.

मात्र समाजातील एका विकृतीमुळे हे स्वप्न पूर्णत्वाला जाऊ शकले नाही. त्यामुळे अशा घटनांमध्ये तातडीने कारवाई होणे अपेक्षित आहे. राजगुरुनगरमधील ही घटना माणुसकीला, नातेसंबंधांना काळीमा फासणारी आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा व्हावी. यासाठी हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

> “ माता-भगिनींच्या सुरक्षेसाठी समाजातील विकृत प्रवृत्तींवर जरब बसविणे गरजेचे झाले आहे. राजगुरुनगरमधील घटनेमध्ये ही आपल्यामध्येच वावरणाऱ्या एका विकृतीमुळे उदयोन्मुख तरुणीचा अंत झाला. ही घटना मनाला हेलावून टाकणारी आहे. माता-भगिनींच्या सुरक्षेसाठी कडक कायदे सरकारने केलेले आहे. त्याची अंमलबजावणी व्हावी. सदर खटला ‘फास्टट्रॅक कोर्ट’मध्ये चालवून आरोपीला फाशीच व्हावी, अशी मागणी आहे.
> **–महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## बहिणाबाईंच्या कविता आजही समर्पक - शंकर जगताप

### जीवनगाथा बहिणाबाईंची : लेवा पाटीदार मित्र मंडळाच्या कार्यक्रमात प्रेक्षक मंत्रमुग्ध

**| पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |**

‘कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची ‘अरे संसार संसार...’ ही कविता आजही समर्पक आहे! त्यांनी सांगितलेले जीवनाचे सत्य अनुसरून लेवा पाटीदार मंडळे पिंपरी - चिंचवडच्या प्रगतीमध्ये सातत्याने आपले योगदान देत आहे!’ असे गौरवोद्गार चिंचवड विधानसभा आमदार शंकर जगताप यांनी काढले.

निळू फुले प्रेक्षागृह, सांगवी येथे लेवा पाटीदार मित्रमंडळ, सांगवी, पुणे आणि भारतरत्न सरदार वल्लभभाई प्रतिष्ठान , पाटील टुर्स ग्रुप ऑफ कंपनी प्रायोजित ‘जीवनगाथा बहिणाबाईंची...’ या निसर्गकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यावरील पन्नास कलाकारांनी सादर केलेल्या भव्यदिव्य रंगमंचीय आविष्काराचे उद्घाटन करताना आमदार शंकर जगताप बोलत होते.

अध्यक्षस्थानी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ मुंबईचे कल्याण आयुक्त रविराज इळवे होते. पिंपरी - चिंचवड महापालिका माजी सभागृह नेता नामदेव ढाके, माजी नगरसेविका शारदा सोनवणे, सुजाता इळवे, ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत चौगुले, लेवा पाटीदार मित्रमंडळाचे अध्यक्ष भागवत झोपे, सचिव महेश बोरोले, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंकज पाटील स्थायी समितीचे माजी सभापती प्रशांत शितोळे उपस्थित होते.

रविराज इळवे यांनी अध्यक्षीय मनोगतातून बहिणाबाई यांच्या कोणत्याही रचना रूढार्थाने प्रेम कविता नव्हत्या तरीही त्या अजरामर झालेल्या आहेत!’ असे मत व्यक्त केले. पंकज पाटील यांनी प्रास्ताविकातून, ‘मनोरंजनातून



संस्कृतीच्या संचिताकडे नेणारा बहिणाबाईंच्या जीवनावरील हा कार्यक्रम आहे. स्वर्गीय प्राध्यापिका कमल पाटील यांच्या स्मरणार्थ हा कार्यक्रम आहे, तसेच सुमारे तेरा वर्षांनंतर उद्योगनगरीत हा प्रयोग पुन्हा होत आहे. ‘ अशी माहिती दिली. शारदा सोनवणे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले; तर श्रीकांत चौगुले यांनी, ‘आचार्य अत्रे यांच्यामुळे पहिल्यांदा बहिणाबाईंच्या कविता महाराष्ट्राला माहीत झाल्या. खानदेशी माती आणि संस्कृती यांचा अस्सल गंध असणारा जीवनानुभवावर आधारित साहित्य ठेवा हा मराठी भाषेतील अनमोल ठेवा आहे!’ असे विचार मांडले. कार्यक्रम सादर करणारे भुसावल येथील सांस्कृतिक कलानिकेतन ग्रुपचे दिग्दर्शक मुकेश खपली आणि संगीतकार शंभू गोडबोले यांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला.

संजय भंगाळे, डॉ मिलिंद चौधरी, नीना खर्चे, अमोल पाटील, पुरुषोत्तम पिंपळे, देवेंद्र पाटील, देवेंद्र भारंबे, राकेश वायकोळे, लक्षण शिंदे, दिनकर मोरे, सुरेश कंक, राजेंद्र येडे, किशोर शिंदे, रघुनाथ फेगडे, विजय जावळे, विकास कोरे, अशोक तळेले, हर्षाली नेहेते, भूषण गाजरे, वैशाली चौधरी, विलास पाटील, माधवी लोमटे, संजना अत्तरदे, हिमानी चौधरी, सचिन वाणी, भूषण पाटील, डॉ. लीलाधर पाटील, कैलास रोटे, महेश पाटील, मधुकर पाचपांडे, यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतले.

ADMISSION OPEN

From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday

Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation Batch

"यत् भावो – तत् भवति"

Our Courses



- Corel Draw
- Adobe Photoshop
- Scratch Animation
- 'C' Language
- 'C ++' Language
- Basic Java
- Basic Tally
- M. S. Office

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Website : www.http://mastermindglobalschool.com


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

KAMALA Education Society

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

# ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

## BBA



**Bachelor of Business Administration**

## BCA



**Bachelor of Computer Applications**

## Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


KAMALA
Education Society
KAMALA EDUCATION SOCIETY'S
PRATIBHA INSTITUTE OF
BUSINESS MANAGEMENT
AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167
Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University
ADMISSIONS OPEN
Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)
BBA
Bachelor of Business Administration
BCA
Bachelor of Computer Applications
Highlights:
Advanced Industrial and Research Learning
Proven Track Record of Placements
Mentoring and Seed Funds for Startups
Skill Development and Certification Courses
Live Industrial Projects
Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
Govt. and Management Scholarships
State of the Art infrastructure
ICT enabled classrooms
Eligibility: Passed HSC Examination with any stream
Call for more details:
BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556
BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895
www.pibmpune.org.in
Scan QR code to know more